**MHAU070023742025**

<u>वादीतर्फे सा. क्र. २</u>

<u>वि.दि.दावा क्रमांक २५६/२०२५</u>

<u>निशाणी क्रमांक ५९ लगत</u>

<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.चव्हाण यांच्या मार्फत</u>

**४.** हे म्हणणे खरे आहे की, वादी माझे जवळचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७-२००८ साली मला दावा मिळकतीकडे जाण्याचे काम पडले नाही. सन २००७ ते २०१४-२०१५ या कालावधीमध्ये दादासाहेब व त्याचा मुलगा यांनी दावा मिळकतीत मक्का व ईतर पिके घेतल्याचे मला माहीती आहे.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, मी २५/१०/२००७ रोजी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या करारावर नोटरीसमक्ष सही केली. हे म्हणणे खरे आहे की, दि.२५/१०/२००७ नंतर मला पुन्हा वादी व प्रतिवादी यांच्या व्यवहारा संदर्भात कोणत्याही नोटरीसमक्ष सही करण्याचे काम पडले नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील व्यवहारासंदर्भात झालेला कागद टंकलिखीत केला तेव्हा त्यावर माझे नाव सुध्दा टंकलिखीत केले होते. कितव्या क्रमांकावर माझे नाव नमुद होते हे मला आता सांगता येणार नाही. सदर दस्तावर काही मजकुर पेनाने लिहीला होता किंवा कसे हे मला आता आठवत नाही.

**६.** रक्कम रु.४,००,०००/- प्रतिवादी यांना नगदी दिले होते. सदरची रक्कम औरंगाबाद येथे दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद केले आहे त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचा व्यवहार झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद केल्याप्रमाणे व्यवहार झाला नाही व वादीने नगदी रक्कम रु.४,००,०००/- प्रतिवादीला दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो

त्याप्रमाणे खरेदी विक्री करार / ईसारपावती झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत व्हावी म्हणुन मी खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.03.12 17:39:37 +0530

दिनांकः- १२/०३/२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर